नंदुरबार येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु
करण्याकरिता आवश्यक पद निर्मितीबाबत

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
शासन निर्णय क्र.पदनि-१७१३/प्र.क्र.०७/१३/वैसेवा-२,
गो.ते.रुग्णालय परिसर, नवीन संकुल,लोकमान्य टिळक रोड,
मुंबई, ४०० ००१
दिनांक :- २० नोव्हेंबर, २०२०

वाचा : १. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन निर्णय क्रमांक एमईडी-२०१०/ प्र.क्र.७६(अ)/२०१०/ शिक्षण-१, दिनांक ३१.१.२०१२.

२. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र.संवैशिवसं/अलिबाग, नंदुरबार, सातारा / नवीन बाब/प्रस्ताव/१२//अ-५, दिनांक ०१.०१.२०१३, दि.२२.०६.२०१७, दि.१३.१०.२०१७ व दि.१७.०७.२०१९

प्रस्तावना :-

महाराष्ट्र राज्यामध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांची प्रवेश क्षमता मर्यादित राहिल्याने केंद्र शासनाच्या व भारतीय आयुविज्ञान परिषदेच्या मान्यतेच्या अधीन अलिबाग (जि.रायगड), नंदुरबार, सातारा व मुंबई महानगर परिसर येथे प्रत्येकी १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व त्यास संलग्नित ५०० खाटांचे रुग्णालय सुरु करण्यास मा.मंत्रीमंडळाच्या दि.०२.०१.२०१२ च्या बैठकीतील निर्णयानुसार वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या दिनांक ३१.१.२०१२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णय दि.३१.१.२०१२ अन्वये प्रस्तावित प्रत्येकी महाविद्यालयांसाठी भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकांनुसार विविध संवर्गातील ४ वर्षाकरिता ५१० पदे निर्माण करण्यास तसेच पदनिर्मिती, यंत्रसामग्री, उपकरणे, आवर्ती खर्च, बाह्यस्त्रोत खर्च व नव्याने अनुषंगिक शैक्षणिक रुग्णालय निर्मितीसाठी येणाऱ्या खर्चास त्याचप्रमाणे आवश्यकता भासल्यास पूरक मागणीद्वारे निधी उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकानुसार वर्ष निहाय, आवश्यक पदनाम निहाय पदनिर्मिती आवश्यक असल्यामुळे संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या संदर्भ क्रमांक २ येथील दिनांक १७.०७.२०१९ च्या पत्रान्वये सादर केल्यानुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार येथे निर्माण करावयाच्या पदांच्या पदनाम निहाय पदनिर्मितीस मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय :

नंदुरबार येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी सोबतच्या विवरणपत्र "अ" नुसार प्रथम वर्षाकरिता खालीलप्रमाणे पद निर्मिती करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१) विवरण पत्र अ मध्ये नमुद केल्यानुसार प्रथम वर्षाकरिता वर्ग-१ ते वर्ग-३ ची नियमित १११ पदे निर्माण करण्याबाबत तसेच ५४ काल्पनिक पदे (बाह्यस्त्रोताने / कंत्राटी) अशी एकूण १६५ पदे निर्माण निर्माण करण्यात येत आहेत.

२) प्रथम वर्षाकरिता आवश्यक असलेल्या वर्ग-४ मधील अकुशल स्वरुपाच्या सेवा जास्तीत जास्त १२ इतक्या मनुष्यबळाच्या मर्यादेत उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

३) सदर पदांच्या वेतनाकरीता संस्था निहाय लेखाशिर्ष व आहरण संवितरण सांकेतांक मंजूर करुन घेण्यात यावे.

४) पुढील टप्प्यांच्या वेतनाची तरतूद संस्थेच्या प्रती वर्षीच्या अंदाजपत्रकात करण्यात यावी.

५) पुढील टप्प्यांच्या पदांचा समावेश प्रतीवर्षी अस्थायी पदांच्या मुदतवाढ प्रस्तावात करण्यात यावा.

२. हा शासन मा.मंत्रीमंडळाच्या दिनांक ०२.०१.२०१२ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार तसेच वित्त विभागाने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२०६/आपुक, दिनांक २९.०९.२०२० अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(संतोष ग्रा. देशमुख)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई, यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
४. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. सर्व मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
७. मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
८. सर्व राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई.
१०. सचिव (वै.शि.) यांचे स्वीय सहायक, मुंबई.
११. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
१२. संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामुग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई.
१३. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,नाशिक (५ प्रती)
१४. जिल्हाधिकारी, नंदुरबार.
१५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२ महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
१६. जिल्हा कोषागार अधिकारी, नंदुरबार
१७. सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये.

१८. ग्रंथपाल, ग्रंथालय, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.

१९. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई

२०. सर्व उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी/नोंदणी शाखा प्रमुख, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.

२१. निवड नस्ती (वैसेवा-२)

शासन निर्णय क्रमांक पदनि-१७१३/प्र.क्र.०७/१३/वैसेवा-२, दिनांक २०.११.२०२० चे सहपत्र

नंदुरबार येथे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी पदनिर्मिती (प्रथमवर्ष सन २०२०-२१)

विवरणपत्र "अ"

| अ.क्र. | पदाचे नाव | वेतनश्रेणी | पदसंख्या |
|---|---|---|---|
| | | **गट अ** | |
| १ | अधिष्ठाता | Academic level-१४<br>१,४४,२००-२,१८,२०० | १ |
| २ | प्राध्यापक | Academic level-१४<br>१,४४,२००-२,१८,२०० | ५ |
| ३ | सहयोगी प्राध्यापक | Academic level-१३A<br>१,३१,४००-२,१७,१०० | १४ |
| ४ | मुख्य प्रशासकीय अधिकारी | S-२० :<br>५६,१००-१,७७,५०० | १ |
| | | **एकुण** | २१ |
| | | **गट-ब** | |
| ५ | सहाय्यक प्राध्यापक | Academic level-१०<br>५७,७००-१,८२,४०० | १८ |
| ६ | प्रशासकीय अधिकारी | S-१५ :<br>४१,८००-१,३२,३०० | १ |
| | | **एकुण** | १९ |
| | | **गट -क** | |
| ७ | ग्रंथपाल | S-१४ : ३८,६००-१,२२,८०० | १ |
| ८ | वरिष्ठ सहाय्यक/ रोखपाल | S-१३ : ३५,४००-१,१२,४०० | २ |
| ९ | भांडारपाल | S-१३ : ३५,४००-१,१२,४०० | ६ |
| १० | तंत्रज्ञ | S-१३ : ३५,४००-१,१२,४०० | ५ |
| ११ | सहाय्यक ग्रंथपाल | S-१० : २९,२००-९२,३०० | १ |
| १२ | लघुटंकलेखक | S-८ : २५,५००-८१,१०० | ७ |
| १३ | वरिष्ठ लिपीक | S-८ : २५,५००-८१,१०० | २ |
| १४ | प्रयोगशाळा सहाय्यक | S-७ : २१,७००-६९,१०० | ३ |
| १५ | कनिष्ठ लिपीक | S-६ : १९,९००-६३,२०० | ६ |
| | | **एकुण** | ३३ |
| | वर्ग-१ ते वर्ग-३ नियमित पदे **एकुण** | | ७३ |
| | | विद्यार्थी पदे | |
| १६ | क्लिनिकल ट्युटर<br>(चिकित्सालयीन पाठ्यनिर्देशक) | S-१५ : ४१,८००-१,३२,३०० | १७ |

| | | | |
|---|---|---|---|
| १७ | वरिष्ठ निवासी | २५००० | १८ |
| १८ | कनिष्ठ निवासी-१ | ५४५५१ (विद्यावेतन) | ३ |
| | | **एकूण** | ३८ |
| **एकत्रित एकुण (वर्ग-१ ते वर्ग-३ नियमित + विद्यार्थी पदे)** | | | १११ |

काल्पनिक पदे -:निर्माण करावयाची पदे (बाह्यस्त्रोताने)

| अ.क्र. | पदाचे नाव | एकत्रित वेतन | पदसंख्या |
|---|---|---|---|
| वर्ग-३ (काल्पनिक पदे / बाह्यस्त्रोताने) | | | |
| १ | कलाकार | १०,०००/- | १ |
| २ | ग्रंथालय सहाय्यक | १०,०००/- | १ |
| ३ | कनिष्ठ लिपीक | १०,०००/- | ३ |
| ४ | तंत्रज्ञ | १०,०००/- | २१ |
| ५ | प्रयोगशाळा सहाय्यक | १०,०००/- | ११ |
| ६ | सुतार | १०,०००/- | १ |
| ७ | प्लंबर | १०,०००/- | १ |
| ८ | वाहन चालक | १०,०००/- | २ |
| | | **एकूण** | ४१ |
| वर्ग-४ (कंत्राटी पदे) | | | |
| ९ | धोबी | ८०००/- | २ |
| १० | दप्तरी | ८०००/- | २ |
| ११ | शिपाई | ८०००/- | ८ |
| १२ | हमाल | ८०००/- | १ |
| | | **एकूण** | १३ |
| वर्ग-३ **काल्पनिक** पदे + वर्ग-४ **कंत्राटी** पदे | | | ५४ |

( संतोष ज्ञा. देशमुख )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.